# घोटा येथे एक दिवसीय विधी सेवा जागृती शिबिराचे आयोजन

**धारणी दि.२० ज्ञानदेव येवले**

जी.एच.रायसोनी विद्यापीठ, अमरावती तर्फे मेळघाटातील राणामालुर ग्रामपंचायत गाव घोटा येथे एक दिवसीय विधी सेवा जागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यापीठातील सुमारे ३० विद्यार्थी व ७५ हून अधिक ग्रामस्थ उपस्थित होते. सरस्वती पूजन व पाहुण्यांचे स्वागत करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

जी.एच.रायसोनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विनायक देशपांडे, कुलसचिव प्रा. स्नेहिल जैस्वाल, विद्यार्थी कल्याणचे डीन, दयासागर सोशल सेंटरचे संचालिका सिस्टर अमृता जॉर्ज, डॉ.प्रशांत अवचट, राणामालुर ग्रामपंचायतीच्या सरपंच गंगाताई जावरकर, माजी सरपंच बिसराम धांडे, पंचायत सदस्य रामेश्वर बेठेकर, पोलीस पाटील मन्साराम धांडे, आडा पटेल आदी उपस्थित होते. तालुका विधी जितेंद्र काशीकर व सेवा समिती धारणीचे किनगे सर व सामाजिक कार्यकर्ते रामरतन गायन यांना निमंत्रित करण्यात आले होते.




कायदेशीर माहितीचे प्रमुख वक्ते डॉ. रंजन दुबे, विधी विभाग प्रमुख डॉ.संतोष चौबे, डॉ.मीनाक्षी काळे, प्रा. कोमल खजोणे, प्रा. शीतल वरणकर, प्रा. भुवनेश्वर बावनकर, दयासागर सामाजिक केंद्राच्या संचालिका सिस्टर अमृता जॉर्ज, रेणू मोहोड, कु. हेमा कासदेकर, कु. गीता चव्हाण आणि दयासागर सोशल सेंटर राणीग्रामचे सबल प्रकल्प समन्वयक आदींचा सहभाग होता.

यावेळी डॉ.काळे यांनी ग्राहकांशी संबंधित विविध माहिती, प्रा. खजोने शिक्षणाचा अधिकार आणि शिक्षणाचे महत्त्व, प्रा. वरणकर यांनी सामाजिक दुष्प्रवृत्ती व त्यासंबंधीच्या तरतुदींची माहिती दिली, प्रा. मोहोड यांनी कामगार कायद्यातील तरतुदींची माहिती दिली, डॉ.दुबे यांनी शासकीय योजनांची माहिती दिली तर डॉ.चौबे यांनी घटनात्मक कायदा, पालकांची जबाबदारी, स्त्री शिक्षणाची गरज, व्यसनमुक्ती याविषयी माहिती दिली.

अतिथी सिस्टर अमृता जॉर्ज यांनी सामाजिक दुष्कृत्यांपासून मुक्त होण्याचे आवाहन केले. सिस्टर मेळघाटातील 30 गावांमध्ये त्यांच्या सामाजिक केंद्राच्या माध्यमातून सर्वांगीण सेवेद्वारे सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडत आहेत. जि. एच.रायसोनी विद्यापीठाने अमरावतीच्या विधी सेवा विभागातील शिक्षक व विद्यार्थ्यांच्या या कायदेविषयक जनजागृती शिबिराचे कौतुक करताना रायसोनी विद्यापीठाने मेळघाट परिसरासाठी वेळोवेळी असे कार्यक्रम आयोजित करावेत, अशी विनंती केली.

सरपंच गंगाताई यांनी शिबिरात मनमोकळेपणाने आपल्या भावना व्यक्त केल्या, त्यांनी गावकऱ्यांना कायद्याच्या क्षेत्रात येणाऱ्या अडचणी सांगितल्या, त्यांनी दिलेली कायदेशीर माहिती अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगून त्यांनी मेळघाटातील मुलांनीही वकील व न्यायाधीश व्हावे, असे सांगितले. कायद्याचे शिक्षण घ्याचे, ते म्हणाले की आमच्या भागातील हेमा कासदेकर, गीता चव्हाण आणि साध्वी भिलवेकर या तीन विद्यार्थिनी जी.एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावती येथून कायद्याचे शिक्षण घेत आहेत, याचा तिला विशेष सन्मान वाटतो. सबल प्रकल्पचे समन्वयक हरिचंद भिलावेकर यांनीही विधी सेवा शिबिरात आलेल्या लोकांना संबोधित करून विधी सेवेचे महत्त्व सांगितले, त्याचा लाभ गावातील लोकांनी घ्यावा, अशी माहिती प्रकल्प समन्वयक हरिचंद भिलवेकर यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व व्यवस्थापनाची भूमिका डॉ.चौबे यांनी केली तर आभार प्रदर्शन प्रा. कोमल खजोणे यांनी केले.

दैनिक बातमीदार

RAISONI GROUP
a vision beyond

Friday 22/03/2024

# जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये 'आंतरशालेय विज्ञान स्पर्धेन' राष्ट्रीय विज्ञान दिवस उत्साहात साजरा

## स्पर्धेद्वारे कल्पनाशक्तीला मिळाला वाव ; शहरातील विविध स्कूलमधील विध्यार्थ्यांचा मोठ्या संख्येने सहभाग










**जळगांव / प्रतिनिधी**

सावखेडा येथील जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जळगाव जिल्ह्यातील विविध स्कूलमधील विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी व त्यांच्यातील उद्याच्या शास्त्रज्ञांना प्रोत्साहन देण्यासाठी आंतरशालेय विज्ञान प्रदर्शन आणि पोस्ट 'स्पर्धा जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये आयोजित करण्यात आल्या होत्या. या वर्षीच्या प्रदर्शनात विविध शहरातील स्कूल सहभागी झाल्या होत्या तर ३२ प्रोजेक्ट मांडण्यात आले होते. तिसरी ते सातवी, सहावी ते आठवी व नववी ते बारावी अशा तीन गटाम ध्ये स्पर्धा झाली. यावेळी प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह विजेत्यांना देण्यात आली.

विज्ञान प्रदर्शनासाठी एआय इन एव्हरीडे लाईफ, रोबोटिक्स, रोबोवेअर, टेक्नॉलॉजी इन हेल्थकेअर अँड मेडिसिन, एरोस्पेस, एरोडायनामिक्स, आयओटी, इंटरनेट ऑफ थिंग्स, वेबेथोन, कोडकॉम्बैट असे विषय देण्यात आले होते आणि पोस्टर्स स्पर्धेसाठी सस्टेनेबल एनर्जी, कन्सर्वेशन ऑफ बायोडायव्हर्सिटी, अर्थ अँड प्लॅनेटरी सायन्स असे विविध विषय देण्यात आले होते. विज्ञान प्रदर्शनात तिसरी ते सातवी गटात पहिले बक्षीस - दक्ष अमित शर्मा (डळ-ऋळ तंत्रज्ञान), दुसरे - अबीर ठाकूर व आरव वराडे(शाश्वत ऊर्जा) तसेच कौशिकी चौबे व शनाया सोनी (सौर यंत्रणा) यांना तृतीय क्रमांक विभागून देण्यात आला. तर सहावी ते आठवी गटात पहिले बक्षीस - मिहिरसिंग मौर्य व नैतिक कोठारी(आरसी प्लेन) दुसरे - विहान मुथा व कलश मुंदडा (मॅग्लेव्ह ट्रेन) तर तिसरे बक्षीस समर्थ नेमाने व उदय बोरसे(स्लीपलेस गॉगल) यांना देण्यात आले. विशेष पारितोषिक असलेले सर्वोत्तम नाविन्यपूर्ण मॉडेल म्हणून हिमांशू रंगलानी व स्मिथ सावना यांच्या एअर लाँचरला तसेच जैनील गाला यांच्या सर्विंग रोबोटला देण्यात आले.

बक्षीस वितरण कार्यक्रमात उपस्थित विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका तेजल ओझा म्हणाले की, आजच्या विद्यार्थ्यांमधून भविष्यात एखादा वैज्ञानिक घडणार आहे. यासाठी शालेय जीवनातच वैज्ञानिक दृष्टीकोन रुजवण्याची गरज आहे. या बालवैज्ञानिकांकडूनच भारत देशाला दुसरे नोबेल पारितोषिक मिळवून देण्याची अपेक्षा आहे. ही जबाबदारी भावी पिढी नक्कीच स्वीकारुन आपली वाटचाल करेल, असा विश्वास व्यक्त करत विज्ञान प्रदर्शनात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या संपूर्ण स्पर्धेचे परीक्षण बायोकेमिस्ट्रिमधील उद्योजक डॉ. निलेश तेली यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सारिका शर्मा यांनी केले तर आभार लीना त्रिपाटी व अश्विनी घोगले यांनी मानले. तसेच सदर स्पर्धेचे यशस्वीरीत्या आयोजन केल्याबद्दल जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलचे संचालक श्री. श्रेयसजी रायसोनी यांनी अभिनंदन केले.

दैनिक पुण्यप्रताप

RAISONI GROUP
a vision beyond

Friday 22/03/2024

# जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये इंटर हाउस जीके क्विज स्पर्धेचे आयोजन

जळगाव- सावखेडा येथील जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूल वर्षभर विध्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवीत असते. याच अनुषगाने प्राथमिक विभागात इंटर हाउस जनरल नॉलेज प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, ही स्पर्धा नर्सरी, ज्युनिअर केजी व सिनिअर केजी या तीन गटात विभागण्यात आली. यावेळी विविध गटातील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत विविध स्तरावर पारितोषिके पटकावली. बक्षीस वितरण कार्यक्रमाला जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका तेजल ओझा या प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना त्यांनी नमूद केले कि, शालेय विध्यार्थ्यांचे कुतूहल जागृत करण्यासाठी जीके क्विज या स्पर्धांसारखे उपक्रम अत्यंत महत्वाची भुमिका बजावतात तसेच बऱ्याच पातळीवर यश मिळवण्यासाठी व्यापक ज्ञानाचा आधार हा महत्त्वाचा असतो म्हणजेच आजच्या प्रवाहात यश मिळविण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांसाठी सामान्य ज्ञान (जीके) हे महत्त्वाचे असून विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच स्वतःचे ज्ञान विकसित करण्यास ते मदत करते. तसेच मोठे झाल्यावर त्यांचा जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोनही वाढतो. वर्गातील अभ्यासक्रमाच्या



पलीकडे असलेले ज्ञान विध्यार्थ्यांना नंतर त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात सर्वोत्कृष्ट होण्यास मदत करते. त्यामुळेच जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये जनरल नॉलेज हा विषय अभ्यासक्रमाचा एक महत्त्वाचा भाग बनला असून विध्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाठी आम्ही वर्षभर असे उपक्रम राबवीत असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी स्कूलमधील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यानी सहकार्य केले तर सदर स्पर्धेचे यशस्वीरीत्या आयोजन केल्याबद्धल जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलचे संचालक श्री. श्रेयस रायसोनी यांनी अभिनंदन केले.

स्पर्धेचा निकाल

नर्सरी ए - दीआ गौरव बोथरा , ओजस्वी मिहीर महाजन, स्तुती विनोद सोनार, संमवेग अमित सांखला, गर्वित अजित काळे

नर्सरी बी - सिया तुषार विसावे, विधी वैभव शिरतुरे, ध्वनी अमित मंडोरे, धनवी राहुल तोडा

ज्यु. केजी ए - ग्रीषा आशिष श्री, मनवा वैभव पाटील, मुक्तिका हरगोपाल रायला, पृथवी पूरब बंग, रेविका महेश सोनी, गुणवीरसिंग सज्जनसिंग चव्हाण

ज्यु. केजी बी - संस्कृती बापूसाहेब पाटील, माही पियुष संघवी, मारिया मुर्तझा अमरेलीवाला, युविका रॉबिन लुल्ला, सारा सौरभ लोढा, वीरा अमित शर्मा

सी. केजी ए - अनय आशिष नाथानी, इरा निरंजन देशमुख, प्रियांश स्वप्नील वंजारी, अर्ना संकेत पाटील, शिवांश महेश नाईक, सान्वी दीप रंगलानी

www.raisoni.net | Engineering | Management | Law | Schools | Other Courses
NAGPUR ■ PUNE ■ JALGAON ■ AMRAVATI ■ AHMEDNAGAR ■ CHHINDWARA
RAISONI GROUP OF INSTITUTIONS

हिंदुस्थान
पुरोगामी राष्ट्रीय विचारांचे दैनिक

RAISONI GROUP
a vision beyond

Friday 22/03/2024

# ‘आर्टिफिशियल इंटेलिजन्स’ वैद्यकीय क्षेत्राला लाभलेले वरदान : डॉ. अभिनव देशपांडे

## जी.एच.रायसोनी विद्यापीठात अतिथी व्याख्यान

अमरावती दि. २१ : वैद्यकीय क्षेत्रात आर्टिफिशियल इंटेलिजन्सने अगदी थक्क करून टाकणारे बदल घडवून आणलेले असून रोगनिदान ते रुग्ण बरा होईपर्यंतच्या विविध प्रक्रियेमध्ये या तंत्राने क्रांती घडवून आणलेली आहे. त्यामुळे हे तंत्र वैद्यकीय क्षेत्राला लाभलेली फार मोठी देणगी आहे, असे वक्तव्य नागपूर येथील प्रसिद्ध ऑंकोलॉजिस्ट डॉ. अभिनव देशपांडे यांनी केले. जी एच रायसोनी विद्यापीठात 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स : आधुनिक तंत्रज्ञान आणि वैद्यकशास्त्राच्या दृश्यांची स्थापना' या विषयावर आयोजित विशेष अतिथी व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाला कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे तसेच रजिस्ट्रार प्रो. स्नेहिल देशपांडे मंचावर उपस्थित होते.



दोन तासांच्या आपल्या व्याख्यानात डॉ. अभिनव देशपांडे यांनी १९७२ साली स्टॅनफर्ड विद्यापीठात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वैद्यकीय क्षेत्रात झालेला पहिला वापर इथपासून ते आतापर्यंत या तंत्राने वैद्यकीय क्षेत्रात केलेल्या अभूतपूर्व कार्यांचे तपशील अधोरेखित केले. त्यांनी कर्करोगाच्या रुग्णावर रचत: या तंत्राचा वापर करून केलेल्या शस्त्रक्रियेच्या चित्रफिती दाखवून जटिल शस्त्रक्रिया सोपी आणि अधिक सक्षमपणे करण्यात आर्टिफिशियल इंटेलिजन्स किती महत्वाची भूमिका बजावते ते विशद केले.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स या पूर्णपणे मानवनिर्मित तंत्रज्ञानाने वैद्यकीय क्षेत्रात पारंपरिक उपचार पद्धतीतील मर्यादांचे कुंपण तोडले असून माणसाने माणसाच्या भल्यासाठी निर्माण केलेले हे नवे तंत्रज्ञान असल्याचे ते म्हणाले. तंत्रज्ञान समृद्ध झाले असले तरी अद्यापही मानवी भावनांच्या आधारे काम करणाऱ्या माणसाचे महात्म्य अबाधित आहे, हेही त्यांनी आवर्जून सांगितले. खासकरून कॅन्सरच्या उपचाराच्या लढ्यात आर्टिफिशियल इंटेलिजन्सने मोठी क्रांती केली असून मेडिकल डिव्हायसेस वेगवान करण्याच्या कामात या तंत्राने अत्यंत मोलाची भूमिका बजावली असल्याचे त्यांनी सांगितले. या नव्या तंत्राच्या साह्याने डिजिटल कन्सल्टेशन, शरीरातील गाठीचे अचूक निदान, रक्तातील साखरेचे प्रमाण ओळखणे, मुलांची गर्भातली वाढ आणि उपचारांची गरज, एखादी जखम बसायला नेमका किती कालावधी लागणार आहे आणि त्यायोगे उपचारात काय बदल करणे गरजेचे आहे, अशा अनेक बाबींमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स मोलाची भूमिका बजावत असल्याचे डॉ. अभिनव देशपांडे यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात बोलताना डॉ. विनायक देशपांडे यांनी अभियांत्रिकी आणि वैद्यकीय क्षेत्रामध्ये समन्वय आणि संवाद गरजेचा असून त्यातून नव्या संकल्पनांची निर्मिती हीच नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाला अभिप्रेत असल्याचे मत व्यक्त केले.

दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. पाहुण्यांचा परिचय रजिस्ट्रार प्रो. स्नेहिल जयस्वाल यांनी करून दिला. कार्यक्रमाचे संचालन प्रो. अश्विनी राठी यांनी केले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. सचिन काळे यांनी भूमिका बजावली. रिसर्च अँड डेव्हलपमेंट विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला स्टुडंट वेल्फेअर डीन प्रो. प्रशांत अवचट, परीक्षा नियंत्रक प्रो. नितीन मडावगडे, डॉ. यशवंत देशपांडे, डॉ. सविता देशपांडे यांच्यासह विद्यापीठातील सर्व विभागाचे डीन, प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

www.raisoni.net
Engineering | Management | Law | Schools | Other Courses
NAGPUR ▪ PUNE ▪ JALGAON ▪ AMRAVATI ▪ AHMEDNAGAR ▪ CHHINDWARA
RAISONI GROUP OF INSTITUTIONS

विदर्भ मतदार

RAISONI GROUP
a vision beyond

**Friday 22/03/2024**

# 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' वैद्यकीय क्षेत्राला लाभलेले वरदान





## ऑंकोलॉजिस्ट डॉ. अभिनव देशपांडे यांचे प्रतिपादन

नमस्कार अमरावती

अमरावती (प्रतिनिधी) दि. २१ : वैद्यकीय क्षेत्रात आर्टिफिशियल इंटेलिजन्सने अगदी थक्क करून टाकणारे बदल घडवून आणलेले असून रोगनिदान ते रुग्ण बरा होईपर्यंतच्या विविध प्रक्रियांमध्ये या तंत्राने क्रांती घडवून आणलेली आहे. त्यामुळे हे तंत्र वैद्यकीय क्षेत्राला लाभलेली फार मोठी देणगी आहे, असे वक्तव्य नागपूर येथील प्रसिद्ध ऑंकोलॉजिस्ट डॉ. अभिनव देशपांडे यांनी केले.

जी एच रायसोनी विद्यापीठात 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स : आधुनिक तंत्रज्ञान आणि वैद्यकशास्त्राच्या दृश्यांची स्थापना' या विषयावर आयोजित विशेष अतिथी व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाला कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे तसेच रजिस्ट्रार प्रो. स्नेहिल देशपांडे मंचावर उपस्थित होते.

दोन तासांच्या आपल्या व्याख्यानात डॉ. अभिनव देशपांडे यांनी १९७२ साली स्टॅनफर्ड विद्यापीठात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वैद्यकीय क्षेत्रात झालेला पहिला वापर इथपासून ते आतापर्यंत या तंत्राने वैद्यकीय क्षेत्रात केलेल्या अभूतपूर्व कार्याचे तपशील अधोरेखित केले. दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने कार्यक्रमाला सुरवात झाली. पाहुण्यांचा परिचय रजिस्ट्रार प्रो. स्नेहिल जयस्वाल यांनी करून दिला. कार्यक्रमाचे संचालन प्रो. अश्विनी राठी यांनी केले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. सचिन कराळे यांनी भूमिका बजावली. रिसर्च अँड डेव्हलपमेंट विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला स्टुडंट वेल्फेअर डीन प्रो. प्रशांत अवचट, परीक्षा नियंत्रक प्रो. नितीन मांडवगडे, डॉ. यशवंत देशपांडे, डॉ. सविता देशपांडे यांच्यासह विद्यापीठातील सर्व विभागाचे डीन, प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

अमरावती मंडल

RAISONI GROUP
a vision beyond

Friday 22/03/2024

# मेलघाट के बच्चों को भी कानूनी शिक्षा जरूरी



अमरावती-जी.एच.रायसोनी विश्वविद्यालय अमरावती द्वारा एक दिवसीय विधि जागरूकता शिविर का आयोजन मेलघाट के राणामालूर पंचायत ग्राम घोटा में किया गया. इस अवसर पर सरपंच गीता जावरकर ने कहा कि, मेलघाट के बच्चों को भी कानूनी शिक्षा को लेकर वकील और न्यायाधीश बनना चाहिए. कार्यक्रम में कुलपति डॉ.विनायक देशपांडे, कुलसचिव प्रो.स्नेहिल जयस्वाल, डॉ.प्रशांत अवचट, पूर्व सरपंच बिसराम धान्डे, पंस सदस्य रामेश्वर बेठेकर, पुलिस पटेल मंसाराम धांडे, आडा पटेल मनाजी धांडे सहित अनेक मान्यवर उपस्थित थे.

www.raisoni.net Engineering Management Law Schools Other Courses
NAGPUR ▪ PUNE ▪ JALGAON ▪ AMRAVATI ▪ AHMEDNAGAR ▪ CHHINDWARA
RAISONI GROUP OF INSTITUTIONS

पुण्य नगरी
RAISONI GROUP
a vision beyond
Friday 22/03/2024

# आर्टिफिशियल इंटेलिजन्स वैद्यकीय क्षेत्राला लाभलेले वरदान

## डॉ. अभिनव देशपांडे यांचे प्रतिपादन

पुण्य नगरी / प्रतिनिधी

**अमरावती :** वैद्यकीय क्षेत्रात आर्टिफिशियल इंटेलिजन्सने अगदी थक्क करून टाकणारे बदल घडवून आणलेले असून रोगनिदान ते रुग्ण बरा होईपर्यंतच्या विविध प्रक्रियांमध्ये या तंत्राने क्रांती घडवून आणलेली आहे. त्यामुळे हे तंत्र वैद्यकीय क्षेत्राला लाभलेले वरदान आहे, असे प्रतिपादन नागपूर येथील ऑंकोलॉजिस्ट डॉ. अभिनव देशपांडे यांनी केले.



जी. एच. रायसोनी विद्यापीठात 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स : आधुनिक तंत्रज्ञान आणि वैद्यकशास्त्राच्या दृश्यांची स्थापना' या विषयावर आयोजित विशेष अतिथी व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाला कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे तसेच रजिस्ट्रार प्रो. स्नेहिल जयस्वाल मंचावर उपस्थित होते. दोन तासांच्या आपल्या व्याख्यानात डॉ. अभिनव देशपांडे यांनी १९७२ साली स्टॅनफर्ड विद्यापीठात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वैद्यकीय क्षेत्रात झालेला पहिला वापर इथपासून ते आतापर्यंत या तंत्राने वैद्यकीय क्षेत्रात केलेल्या अभूतपूर्व कार्यांचे तपशील अधोरेखित केले.

दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने कार्यक्रमाला सुरवात झाली. पाहुण्यांचा परिचय रजिस्ट्रार प्रो. स्नेहिल जयस्वाल यांनी करून दिला. कार्यक्रमाचे संचालन प्रो. अश्विनी राठी यांनी केले. रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला स्टुडंट वेल्फेअर डीन प्रो. प्रशांत अवचट, परीक्षा नियंत्रक प्रो. नितीन मांडवगडे, डॉ. यशवंत देशपांडे, डॉ. सविता देशपांडे आदी उपस्थित होते.

www.raisoni.net | Engineering | Management | Law | Schools | Other Courses
NAGPUR ■ PUNE ■ JALGAON ■ AMRAVATI ■ AHMEDNAGAR ■ CHHINDWARA
RAISONI GROUP OF INSTITUTIONS

विदर्भ की बात

RAISONI GROUP
a vision beyond

Friday 22/03/2024

# जीएच रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग में दीक्षांत समारोह कल

**नागपुर।** वी.एन.आई.टी. निदेशक डॉ.प्रमोद पडोले को 23 मार्च, 2024 को जी एच रायसोनी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, नागपुर में दीक्षांत समारोह के मुख्य तौर पर आमंत्रित किया गया है। शिक्षातज्ञ, प्रोफेसर और समाज कल्याण के लिए विज्ञान और प्रौद्योगिकी का उपयोग की दृष्टि रखने वाले प्रमुख शोधकताओं में से एक हैं। दीक्षांत समारोह में उनकी उपस्थिति निश्चित रूप से छात्रों को अपने संबंधित क्षेत्रों में उत्कृष्टता हासिल करने के लिए प्रेरित करेगी। जीएचआरसीई ने अपनी स्थापना के बाद से ही उत्कृष्टता की राह पर अग्रसर रहा है और देश की प्रमुख शैक्षणिक संस्थानो में अपने लिए एक अलग जगह बनाई है। दीक्षांत समारोह इंजीनियरिंग और मैनेजमेंट के 2023 के स्नातक और स्नातकोत्तर वर्ष के छात्रों के लिए आयोजित किया गया है। गोंडवाना विश्वविद्यालय के कुलपति और राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय के कार्यवाहक कुलपति डॉ.प्रशांत बोकारे, अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान के कार्यकारी निदेशक डॉ.प्रशांत जोशी, बीओजी के अध्यक्ष व संस्थान के निदेशक सुनील रायसोनी तथा जीएचआरसीई, निदेशक डॉ.सचिन उंटवाले भी इस अवसर पर प्रमुखता से उपस्थित रहेंगे। यह समारोह छात्रों की शिक्षा के प्रति उनकी कड़ी मेहनत और समर्पण का उत्सव है और यह उनके संबंधित क्षेत्रों में उनकी पेशेवर यात्रा की शुरुआत का प्रतीक है। यह संस्थान के लिए गुणवत्तापूर्ण शिक्षा प्रदान करने और कुशल पेशेवर तैयार करने की अपनी प्रतिबद्धता प्रदर्शित करने का एक अवसर भी है। इस स्नातक समारोह में 1172 छात्र अपनी डिग्री प्राप्त करेंगे। शैक्षणिक रूप से उत्कृष्ट प्रदर्शन करने वाले छात्रों को स्वर्ण और रजत पदक प्रदान किए जाएंगे। इस समारोह के दौरान विभिन्न विषयों के 49 स्नातकों को पदक, पुरस्कार, सांत्वना पुरस्कार और योग्यता प्रमाण पत्र प्राप्त होंगे। समारोह में स्नातकों को सर्वश्रेष्ठ एम.टेक थीसिस पुरस्कार, 30 टॉपर्स पुरस्कार, 14 रजत पदक, 3 स्वर्ण पदक और छात्र उपलब्धि पुरस्कार प्राप्त होंगे। जीएचआरसीई, नागपुर के 10वें स्नातक समारोह की आयोजन समिति के सदस्यों, डॉ.प्रमोद वाल्के अकादमिक डीन व डॉ.प्रफुल्ल जे. वाढई-परीक्षा नियंत्रक ने यह जानकारी दी।

www.raisoni.net | Engineering | Management | Law | Schools | Other Courses
NAGPUR ▪ PUNE ▪ JALGAON ▪ AMRAVATI ▪ AHMEDNAGAR ▪ CHHINDWARA
RAISONI GROUP OF INSTITUTIONS

लोकशाही

RAISONI GROUP
a vision beyond

Saturday 23/03/2024




# ‘अॅचिव्हर्स चषक’, मेडल व प्रमाणपत्र देवून गौरव

## रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचा जल्लोष

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव प्रतिनिधी

जी. एच. रायसोनी इस्टीट्युट संचालित सावखेडा येथील जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक आंतरशालेय विविध स्पर्धेत विजयी झालेल्या स्पर्धक विद्यार्थ्यांना मेडल, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले. या सांघिक खेळातील विजयी संघाना ‘अॅचिव्हर्स चषक’ व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी व्हॉलीबॉल या खेळप्रकारातील आंतरराष्ट्रीय खेळाडू राजेंद्र पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी सुजाता गुलाने, प्रा. तन्मय भाले, अॅकडमिक डीन लीना त्रिपाठी व जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका तेजल ओझा यांच्या प्रमुख उपस्थितीत हा गुणगौरव सोहळा पार पडला.

जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमधील विद्यार्थी भविष्यामध्ये जळगाव जिल्ह्यासह राज्याचे आणि भारत देशाचे नाव उज्वल करतील असा विश्वास मुख्याध्यापिका तेजल ओझा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना व्यक्त केला.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका निकिता जोशी तर आभार प्रदर्शन अल्फिया लेहरी यांनी केले तसेच कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. तर या कार्यक्रमाचे यशस्वीरीत्या आयोजन केल्याबद्धल जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलचे संचालक श्री. श्रेयसजी रायसोनी यांनी अभिनंदन केले.

दैनिक इनशॉट जळगाव

RAISONI GROUP
a vision beyond

Saturday 23/03/2024

# जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण सोहळा

## 'ॲचिव्हर्स चषक', मेडल व प्रमाणपत्र देवून गौरव ; विद्यार्थ्यांचा जल्लोष

**जळगाव (प्रतिनिधी)**

जी. एच. रायसोनी इस्टीट्युट संचालित सावखेडा येथील जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक आंतरशालेय विविध स्पर्धेत विजयी झालेल्या स्पर्धक विद्यार्थ्यांना मेडल, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले. या सांघिक खेळातील विजयी संघाना 'ॲचिव्हर्स चषक' व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी व्हॉलीबॉल या खेळप्रकारातील आंतरराष्ट्रीय खेळाडू राजेंद्र पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी सुजाता गुलाने, प्रा. तन्मय भाले, ॲकडमिक डीन लीना त्रिपाठी व जी.एच. रायसोनी पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका तेजल ओझा यांच्या प्रमुख उपस्थितीत हा गुणगौरव सोहळा पार पडला.




जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमधील विद्यार्थी भविष्यामध्ये जळगाव जिल्ह्यासह राज्याचे आणि भारत देशाचे नाव उज्वल करतील असा विश्वास मुख्याध्यापिका तेजल ओझा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना व्यक्त केला.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका निकिता जोशी तर आभार प्रदर्शन अल्फिया लेहरी यांनी केले तसेच कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. तर या कार्यक्रमाचे यशस्वीरीत्या आयोजन केल्याबद्दल जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलचे संचालक श्री. श्रेयसजी रायसोनी यांनी अभिनंदन केले.

सायंदैनिक साईमत

RAISONI GROUP
a vision beyond

Saturday 23/03/2024

# रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण उत्साहात

**जळगाव : प्रतिनिधी**



जी. एच. रायसोनी इस्टीट्युट संचालित सावखेडा येथील जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक आंतरशालेय विविध स्पर्धेत विजयी झालेल्या स्पर्धक विद्यार्थ्यांना मेडल, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले. या सांघिक खेळातील विजयी संघाना 'अॅचिव्हर्स चषक' व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी व्हॉलीबॉल या खेळप्रकारातील आंतरराष्ट्रीय खेळाडू राजेंद्र पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी सुजाता गुलाने, प्रा. तन्मय भाले, अॅकडमिक डीन लीना त्रिपाठी व जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका तेजल ओझा यांच्या प्रमुख उपस्थितीत हा गुणगौरव सोहळा पार पडला.

जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमधील विद्यार्थी भविष्यामध्ये जळगाव जिल्ह्यासह राज्याचे आणि भारत देशाचे नाव उज्वल करतील असा विश्वास मुख्याध्यापिका तेजल ओझा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका निकिता जोशी यांनी केले. आभार प्रदर्शन अल्फिया लेहरी यांनी केले. यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

दैनिक दिव्य मराठी

RAISONI GROUP
a vision beyond

Saturday 23/03/2024

# पुरस्कार वितरण कार्यक्रम सम्पन्न




जलगांव | रायसोनी पब्लिक स्कूल में वार्षिक अंतर-स्कूल प्रतियोगिता के विजेताओं को हाल ही में पदक व प्रमाण पत्र देकर सम्मानित किया गया। वॉलीबॉल के अंतरराष्ट्रीय खिलाड़ी राजेंद्र पाटिल, जिला खेल अधिकारी सुजाता गुलाने, प्रो.तन्मय भाले, अकादमिक डीन लीना त्रिपाठी की अध्यक्षता में रायसोनी पब्लिक स्कूल की प्राचार्या तेजल ओझा ने दर्शकों का मार्गदर्शन करते हुए विश्वास व्यक्त किया कि रायसोनी पब्लिक स्कूल के छात्र भविष्य में जलगांव जिले के साथ-साथ राज्य का नाम रोशन करेंगे। शिक्षकों और गैर-शिक्षण कर्मचारियों ने कड़ी मेहनत की। यदि यह कार्यक्रम सफलतापूर्वक आयोजित हुआ। स्कूल के निदेशक श्रेयस रायसोनी ने बधाई दी।

पुण्यनगरी

RAISONI GROUP
a vision beyond

Saturday 23/03/2024

# रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण



जळगाव : जी. एच. रायसोनी इस्टीट्युट संचालित सावखेडा येथील जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक आंतरशालेय विविध स्पर्धेत विजयी झालेल्या स्पर्धक विद्यार्थ्यांना मेडल, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले. या सांघिक खेळातील विजयी संघाना 'अँचिव्हर्स चषक' व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी व्हॉलीबॉल या खेळप्रकारातील आंतरराष्ट्रीय खेळाडू राजेंद्र पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी सुजाता गुलाने, प्रा. तन्मय भाले, अॅकडमिक डीन लीना त्रिपाठी व जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका तेजल ओझा यांच्या प्रमुख उपस्थितीत हा गुणगौरव सोहळा पार पडला. सूत्रसंचालन शिक्षिका निकिता जोशी तर आभार प्रदर्शन अल्फिया लेहरी यांनी केले.

दैनिक पुण्य प्रताप



**Saturday 23/03/2024**

# जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण सोहळा उत्साहात संपन्न

**'अॅचिव्हर्स चषक', मेडल व प्रमाणपत्र देवून गौरव ; विध्यार्थ्यांचा जल्लोष**

जळगाव : जी. एच. रायसोनी इस्टीट्युट संचालित सावखेडा येथील जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक आंतरशालेय विविध स्पर्धेत विजयी झालेल्या स्पर्धक विद्यार्थ्यांना मेडल, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले.




या सांघिक खेळातील विजयी संघाना 'अॅचिव्हर्स चषक' व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी व्हॉलीबॉल या खेळप्रकारातील आंतरराष्ट्रीय खेळाडू राजेंद्र पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी सुजाता गुलाने, प्रा. तन्मय भाले, अॅकडमिक डीन लीना त्रिपाठी व जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका तेजल ओझा यांच्या प्रमुख उपस्थितीत हा गुणगौरव सोहळा पार पडला. जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमधील विद्यार्थी भविष्यामध्ये जळगाव जिल्ह्यासह राज्याचे आणि भारत देशाचे नाव उज्वल करतील असा विश्वास मुख्याध्यापिका तेजल ओझा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना व्यक्त केला.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका निकिता जोशी तर आभार प्रदर्शन अल्फिया लेहरी यांनी केले तसेच कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. तर या कार्यक्रमाचे यशस्वीरीत्या आयोजन केल्याबद्धल जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलचे संचालक श्री. श्रेयसजी रायसोनी यांनी अभिनंदन केले.

# GH Raisoni College of Engg fetes 1,172 students with graduation certificates

GH Raisoni College of Engineering (**GHRCE**) organized its 10th graduation ceremony Saturday.

**Prof Pramod Padole,** director of VNIT, was the chief cuest while the guests of honour were **Dr Prashant Joshi,** ED of AIIMS and Prashant Bokare, acting VC of Nagpur University. Other esteemed guests were **Sachin Solanki,** I/c joint director (technical education), Regional Office, **Raju Hiwase**, NU registrar, Prashant Maheshwary, NU dean (sci & tech), **Sunil Raisoni,** chairman of board of governors of GHRCE, **Sachin Untawale,** director of GHRCE, **Santosh Jaju,** dean, Pramod Walke, dean. All HoDs, students and parents were also present.

The ceremony was declared open by **Sunil Raisoni** who recalled the journey of GHRCE **over 28 years,** acknowledging the institution's resilience and achievements. Untawale welcomed the dignitaries.




After graduation addresses, **1,172 students** (1,033 UG autonomy, M-Tech 85 and MBA 54) were presented **graduation certificates** followed by **17 medals** to meritorious students and outstanding performers. Gold Medals: UG — **Aditi Gajbhiye** of electrical engineering; PG — **Shashank Nanhe** of M-Tech in CAD/CAM; Non-engineering courses — **Shubham Akade** of MBA. The Achiever Award was presented to Aaliya Ali and she administered the pledge to all graduates.

The programme was anchored by **Prof Manish Nair** while **PJ Wadhai,** CoE, GHRCE, proposed a vote of thanks.

दैनिक दिव्य मराठी

RAISONI GROUP
a vision beyond

**Sunday 24/03/2024**

# शहीददिनी शहीद सैनिकांच्या वीरपत्नींचा सन्मान

प्रतिनिधी | जळगाव शहरातील शाळा, महाविद्यालये व सामाजिक संस्थांसह शासकीय कार्यालयांमध्ये शनिवारी शहीद दिन साजरा करण्यात आला. शहीद भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांच्या जीवन कार्याची माहिती देऊन त्यांच्या विविध आठवणींना विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी उजाळा दिला. तसेच शहरातील शहीद सैनिकांच्या वीरपत्नींचाही मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## रायसोनी महाविद्यालयात देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादर



शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना श्रद्धांजली म्हणून शहीद दिवस पाळला जातो. या अनुषंगाने जी. एच. रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड बिझनेस मॅनेजमेंट महाविद्यालयात कारगिल युद्धात वीर मरण पावलेल्या वीर उस्मान शेख यांच्या पत्नी फरिदा शेख तसेच शहीद जवान नरेंद्र महाजन यांच्या पत्नी अर्चना महाजन यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी संचालिका प्रा. डॉ. प्रीती अग्रवाल, डॉ. संजय शेखावत, प्रा. सोनल तिवारी उपस्थित होते. स्टुडंट कौन्सीलच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादर केले. तसेच विद्यार्थ्यांना माहितीपट दाखवण्यात आला.

नवराष्ट्र

RAISONI GROUP
a vision beyond

Sunday 24/03/2024

### शहीद सैनिकांच्या 'वीरपत्नी'चा केला सन्मान

# शहिदांचे कुटुंबीय असल्याचा आहे अभिमान



जळगाव, (वा.) शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना श्रद्धांजली म्हणून दरवर्षी २३मार्च हा दिवस शहीद दिवस म्हणून पाळला जातो. या अनुषंगाने रायसोनी बिजनेस ॲण्ड मॅनेजमेंट महाविद्यालयात कारगिल युद्धात वीर मरण पावलेल्या वीर उस्मान शेख यांच्या पत्नी फरीदा शेख तसेच शहीद जवान नरेंद्र महाजन यांच्या पत्नी अर्चना महाजन या शहीद सैनिकांच्या "वीरपत्नी"चा सन्मान करत शहीद दिन साजरा करण्यात आला.

**सैनिकांच्या धैर्य आणि शौर्यांचा अभिमान असायला हवा**

यावेळी व्यासपीठावर रायसोनी इस्टीट्यूटच्या संचालिका प्रा. डॉ. प्रिती अग्रवाल, अकॅडेमिक डीन प्रा. डॉ. संजय शेखावत व रायसोनी महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. सोनल तिवारी हे उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. प्रिती अग्रवाल यांनी सांगितले की, जवान हे कुटुंबियांना विसरून देशासाठी कायम लढत असतात. त्यांचे जाणे हे अनपेक्षित असते. मात्र, ते देशाकरिता शहीद झाले ही बाब कायम अभिमान देते. सीमेवर लढत असताना जवान कोणत्याही संकटाला सामोरे जातात. त्यांच्यातील धैर्य आणि शौर्याचा अभिमान देशातल्या प्रत्येक नागरिकाला असायला हवा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## शहिद जवानाची पत्नी असल्याचा अभिमान

यानंतर मनोगत कार्यक्रमात वीरपत्नी फरीदा शेख व वीरपत्नी अर्चना महाजन यांनी म्हटले की, जेव्हा समाजात वीरपत्नी म्हणून वावरतो तेव्हा देशासाठी कुटुंबातील एक व्यक्ती शहीद झाल्याचा अभिमान आमच्यात असतो. हाच अभिमान आमची हिम्मत वाढविण्यास पूरक ठरतो. देशाच्या सीमेवर लढणारे सैनिक कधीही कुटुंबियांची काळजी करीत नाही. त्यांच्या मनात कायम देशसेवेची भावना असते. घरातील व्यक्ती देशाच्या सीमेवर शत्रूशी दोन हात करताना बलिदान देते ही अतिशय गर्वाची बाब असते. देशासाठी शहीद होण्यासाठी मोठे भाग्य लागते. त्यामुळे कुटुंबातील व्यक्ती जेव्हा शहीद होते, तेव्हा त्या कुटुंबियाला अभिमान वाटतो, असे म्हणत फरीदा शेख व अर्चना महाजन यांनी आपल्या पतीच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर नृत्य केले.

www.raisoni.net | Engineering | Management | Law | Schools | Other Courses
NAGPUR ▪ PUNE ▪ JALGAON ▪ AMRAVATI ▪ AHMEDNAGAR ▪ CHHINDWARA
RAISONI GROUP OF INSTITUTIONS

पुण्य नगरी

RAISONI GROUP
a vision beyond

Sunday 24/03/2024

# वीरपत्नींचा सन्मान करुन रायसोनी महाविद्यालयात शहीद दिन साजरा




जळगाव : शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना श्रद्धांजली म्हणून दरवर्षी २३ मार्च हा दिवस शहीद दिवस म्हणून पाळला जातो. त्या अनुषंगाने जी. एच. रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अँड बिजनेस मॅनेजमेंट महाविदयालयात कारगिल युद्धात शहीद झालेल्या वीर उस्मान शेख यांच्या पत्नी फरीदा शेख तसेच शहीद जवान नरेंद्र महाजन यांच्या पत्नी अर्चना महाजन या शहीद सैनिकांच्या ''वीरपत्नी''चा सन्मान करत शहीद दिन साजरा करण्यात आला.

याप्रसंगी व्यासपीठावर रायसोनी इस्टीट्यूटच्या संचालिका प्रा. डॉ. प्रिती अग्रवाल, अकॅडेमिक डीन प्रा. डॉ. संजय शेखावत व जी. एच. रायसोनी कनिष्ट महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. सोनल तिवारी हे उपस्थित होते. मनोगत कार्यक्रमात वीरपत्नी फरीदा शेख व वीरपत्नी अर्चना महाजन म्हणाले की, जेव्हा समाजात वीरपत्नी म्हणून वावरतो तेव्हा देशासाठी कुटुंबातील एक व्यक्ती शहीद झाल्याचा अभिमान आमच्यात असतो. हाच अभिमान आमची हिंमत वाढविण्यास पुरक ठरतो, घरातील व्यक्ती देशाच्या सीमेवर शत्रूशी दोन हात करताना बलिदान देते ही अतिशय गर्वाची बाब असते. देशासाठी शहीद होण्यासाठी मोठे भाग्य लागते. यामुळे कुटुंबातील व्यक्ती जेव्हा शहीद होते, तेव्हा त्या कुटुंबियाला अभिमान वाटतो, असे म्हणत फरीदा शेख व अर्चना महाजन यांनी आपल्या पतीच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी प्रा. तुषार पाटील, प्रा. मुकुंद पाटील व प्रा. कल्याणी नेवे हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रा. वसीम पटेल यांनी समन्वय साधले तसेच स्टूडट कोंसील व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमासाठी सहकार्य केले.

दैनिक पुण्यप्रताप

RAISONI GROUP
a vision beyond

**Sunday 24/03/2024**

# शहीद सैनिकांच्या वीरपत्नीचा सन्मान करत जी. एच. रायसोनी महाविद्यालयात शहीद दिन साजरा

जळगाव: शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना श्रद्धांजली म्हणून दरवर्षी २३ मार्च हा दिवस शहीद दिवस म्हणून पाळला जातो या अनुषंगाने जी. एच. रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अँड बिजनेस मॅनेजमेंट महाविद्यालयात कारगिल युद्धात वीर मरण पावलेल्या वीर उस्मान शेख यांच्या पत्नी फरीदा शेख तसेच शहीद जवान नरेंद्र महाजन यांच्या पत्नी अर्चना महाजन या शहीद सैनिकांच्या वीरपत्नीचा सन्मान करत शहीद दिन साजरा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर जी. एच. रायसोनी इस्टीट्यूटच्या संचालिका प्रा. डॉ. प्रिती अग्रवाल, अकॅडेमिक डीन प्रा. डॉ. संजय शेखावत व जी. एच. रायसोनी कनिष्ट महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. सोनल तिवारी हे उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना जी. एच. रायसोनी इस्टीट्यूटच्या संचालिका प्रा. डॉ. प्रिती अग्रवाल यांनी नमूद केले कि, जवान हे कुटुंबियांना विसरून देशासाठी कायम लढत असतात. त्यांचे जाणे हे अनपेक्षित असते मात्र, ते देशाकरिता शहीद झाले ही बाब कायम अभिमान देते. सीमेवर लढत असताना जवान कोणत्याही संकटाला सामोरे जातात. त्यांच्यातील धैर्य आणि



शौर्याचा अभिमान देशातल्या प्रत्येक नागरिकाला असायला हवा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यानंतर मनोगत कार्यक्रमात वीरपत्नी फरीदा शेख व वीरपत्नी अर्चना महाजन यांनी म्हटले कि, जेव्हा समाजात वीरपत्नी म्हणून वावरतो तेव्हा देशासाठी कुटुंबातील एक व्यक्ती शहीद झाल्याचा अभिमान आमच्यात असतो. हाच अभिमान आमची हिंमत वाढविण्यास पुरक ठरतो. देशाच्या सीमेवर लढणारे सैनिक कधीही कुटुंबियांची काळजी करीत नाही. त्यांच्या मनात कायम देशसेवेची भावना असते. घरातील व्यक्ती देशाच्या सीमेवर शत्रूशी दोन हात करताना बलिदान देते ही अतिशय गर्वाची बाब असते. देशासाठी शहीद होण्यासाठी मोठे भाग्य लागते. यामुळे कुटुंबातील व्यक्ती जेव्हा शहीद होते, तेव्हा त्या कुटुंबियाला अभिमान वाटतो, असे म्हणत फरीदा शेख व अर्चना महाजन यांनी आपल्या पतीच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी स्टूडंट कॉसीलच्या विध्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादर केले तसेच माहितीपट दाखविण्यात आला. यावेळी कारगिलच्या युद्धपटाची शौर्य गाथा उलगडत असताना सभागृहात उपस्थितांचे डोळे पाणावल्याचे दिसून आले. कार्यक्रमाच्या अखेरीस राष्ट्रगीत म्हणत 'भारत माता की जय' या घोषणांनी सभागृह दणाणून गेला होता. यावेळी प्रा. तुषार पाटील, प्रा. मुकुंद पाटील व प्रा. कल्याणी नेवे हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रा. वसीम पटेल यांनी समन्वय साधले तसेच स्टूडंट कॉसील व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विध्यार्थ्यांनी या कार्यक्रमासाठी सहकार्य केले.

www.raisoni.net
Engineering Management Law Schools Other Courses
NAGPUR ■ PUNE ■ JALGAON ■ AMRAVATI ■ AHMEDNAGAR ■ CHHINDWARA
RAISONI GROUP OF INSTITUTIONS

नवभारत
RAISONI GROUP
a vision beyond
Sunday 24/03/2024

श्रद्धांजलि | भगत सिंह, सुखदेव और राजगुरु के शहीदी दिवस पर समारोह का आयोजन

# वीरपत्नी फरीदा शेख व अर्चना महाजन का सम्मान

## GH रायसोनी कॉलेज में कार्यक्रम का आयोजन




■ जलगांव (सं). शहीद भगत सिंह, सुखदेव और राजगुरु को श्रद्धांजलि देने के लिए हर साल 23 मार्च को शहीद दिवस के रूप में मनाया जाता है. जीएच रायसोनी इंस्टीट्यूट ऑफ इंजीनियरिंग एंड बिजनेस मैनेजमेंट महाविद्यालय ने कारगिल युद्ध में वीरतापूर्वक शहीद हुए वीर उस्मान शेख की पत्नी फरीदा शेख और शहीद जवान नरेंद्र महाजन की पत्नी अर्चना महाजन को सम्मानित कर शहीद दिवस मनाया. इस अवसर पर जीएच रायसोनी संस्थान की निदेशक प्रो. डॉ. प्रीति अग्रवाल, अकादमिक डीन प्रो. डॉ. संजय शेखावत और रायसोनी जूनियर कॉलेज की प्राचार्य प्रो. सोनल तिवारी मौजूद रहीं. कार्यक्रम का परिचय देते संस्थान की निदेशक प्रो. डॉ. प्रीति अग्रवाल ने कहा कि सैनिक हमेशा अपने परिवार को भूलकर देश के लिए लड़ते हैं. उनका जाना अप्रत्याशित है, लेकिन यह तथ्य कि वह देश के लिए शहीद हो गए, हमें शाश्वत गौरव देता है. सीमा पर लड़ते समय जवानों को हर खतरे का सामना करना पड़ता है. उन्होंने अपील की कि देश के हर नागरिक को अपने साहस और वीरता पर गर्व होना चाहिए. इसके बाद मनोगत कार्यक्रम में वीरपत्नी फरीदा शेख और वीरपत्नी अर्चना महाजन ने कहा कि जब कोई समाज में वीरपत्नी की तरह व्यवहार करता है तो हमें गर्व होता है कि परिवार का एक व्यक्ति देश के लिए शहीद हुआ है. यही गौरव हमारे साहस को बढ़ाता है. देश की सीमा पर लड़ने वाला सैनिक कभी अपने परिवार की चिंता नहीं करता.

## 'देश के लिए शहीद होना गर्व की बात'

उनके हृदय में सदैव राष्ट्रसेवा की भावना रहती है. देश की सीमा पर दुश्मन से लड़ते हुए परिवार के किसी सदस्य का बलिदान देना बहुत गर्व की बात है. देश के लिए शहीद होने के लिए बड़े भाग्य की जरूरत होती है. इस वजह से जब परिवार का कोई सदस्य शहीद होता है तो परिवार को गर्व महसूस होता है. फरीदा शेख और अर्चना महाजन ने अपने पतियों की यादों का बयान किया. इस अवसर पर स्टड काउंसिल के विद्यार्थियों ने देशभक्ति गीतों पर नृत्य किया तथा एक डाक्यूमेंट्री फिल्म दिखाई गई. इस समय जब कारगिल युद्ध की वीर गाथा सामने आ रही थी तो सभागार में मौजूद लोगों की आंखें नम नजर आ रही थीं. कार्यक्रम के अंत में राष्ट्रगान गाते हुए हॉल भारत माता की जय के नारों से गूंज उठा. इस समय प्रो. तुषार और प्रो. कल्याणी उपस्थित थीं.

लोकशाही

RAISONI GROUP
a vision beyond

Wednesday 27/03/2024

# रायसोनी महाविद्यालयात युवा महोत्सव 'अंतराग्नी'ची धूम

## वार्षिक स्नेहसंमेलनात विध्यार्थ्यांचा कलाविष्कार ; ५०० विद्यार्थ्यांनी नोंदविला सहभाग

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

येथील जी. एच. रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अँड बिजनेस मॅनेजमेंट महाविद्यालयात "अंतराग्नी-२०२४" या शीर्षकाखाली सुरु झालेल्या तीन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलनाचा उद्घाटन सोहळा आज ता. २६ मंगळवार रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जी. एच. रायसोनी इस्टीट्युटच्या संचालिका प्रा. डॉ. प्रिती अग्रवाल यांनी फीत कापून या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन केले. विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना नमूद केले कि, महाविद्यालयीन जीवनात वार्षिक स्नेहसंमेलनाला विशेष महत्त्व आहे. स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या प्रतिभांसह कलागुणांना वाव मिळत असुन त्यांच्या सुप्त गुणांसह मानसिक, बौद्धिक तथा शारीरिक विकास साध्य होतो. आजचे विद्यार्थी हे देशाचे उज्चल भविष्य आहेत. शिक्षणासोबतच कलागुणांना वाव देणाऱ्या संधी मिळाल्यास विद्यार्थी हे बौद्धिक, मानसिक व शारिरीकदृष्ट्या सुदृढ असतील तरच समाजाचा व देशाचा आधारस्तंभ होतील. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व संस्कार देऊन उत्तम नागरिक घडविने हे प्राध्यापकांचे



कर्तव्य आहे. असे म्हणत त्यांनी या स्नेह संमेलनानिमित्त आयोजित विविध स्पर्धा व कार्यक्रमाची माहिती दिली तसेच विध्यार्थ्यांना यावेळी विविध स्पर्धा,सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. यानंतर अकॅडेमिक डीन प्रा. डॉ. संजय शेखावत यांनी म्हटले कि, स्नेहसंमेलनाचा प्रमुख हेतू विद्यार्थ्यांच्या अंगीभूत कलागुणांना प्रोत्साहन देणे, भारतीय संस्कृतीची ओळख करून देणे हा असतो. स्नेहसंमेलनात संस्कृती व ऐतिहासिक कार्यक्रमाची झलक सादर होत असल्याने त्यांनी यावेळी समाधान व्यक्त केले. ता.२६ मार्च ते २८ मार्च दरम्यान आयोजित या स्नेहसंमेलन कार्यक्रमांमध्ये नृत्य, गीत गायन, डिपार्टमेंट वॉर, पर्सनालिटी कॉन्स्टटे, दुसऱ्या दिवशी डे सेलिब्रेशन व तिसऱ्या दिवशी शिव महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी विध्यार्थ्यांनी मोह मोह के धागे, मेरे कॉलेज की लडकी, झिंग झिंग झिंगाट, एक राधा एक मीरा, राधा ही बावरी, नवरी नटली, तनहाई तनहाई, अच्छा चलते है दुवा वो मे याद रखना, अशी विविध बहारदार गीते विध्यार्थी स्पर्धकांनी

(पान २ वर)

www.raisoni.net | Engineering | Management | Law | Schools | Other Courses
NAGPUR ■ PUNE ■ JALGAON ■ AMRAVATI ■ AHMEDNAGAR ■ CHHINDWARA
RAISONI GROUP OF INSTITUTIONS

नवराष्ट्र

RAISONI GROUP
a vision beyond

Wednesday 27/03/2024

## युवोत्सव ● स्नेहसंमेलनात ५०० विद्यार्थ्यांचा सहभाग;थरारक पोवाड्याला दिली दाद

# रायसोनी महाविद्यालयात युवामहोत्सव 'अंतराग्नी'ची धूम

जळगांव, (वृ.) येथील जी. एच. रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अँड बिजनेस मॅनेजमेंट महाविद्यालयात 'अंतराग्नी-२०२४' या शीर्षकाखाली सुरु झालेल्या तीन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलनाचा उद्घाटन सोहळा २६ मंगळवार रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. जी. एच. रायसोनी इस्टीट्युटच्या संचालिका प्रा. डॉ. प्रिती अग्रवाल यांनी फीत कापून स्नेहसंमेलनाचे उद्घाटन केले तसेच मनोगत व्यक्त केले. यानंतर अकॅडेमिक डीन प्रा. डॉ. संजय शेखावत यांनी मनोगत व्यक्त केले. २६ मार्च ते २८ मार्च दरम्यान आयोजित या स्नेहसंमेलन कार्यक्रमांमध्ये नृत्य, गीत गायन, डिपार्टमेंट वॉर, पर्सनालिटी कॉन्स्टर्ट, दुसऱ्या दिवशी डे सेलिब्रेशन व तिसऱ्या दिवशी शिव महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.





याप्रसंगी कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांनी मोह मोह के धागे, मेरे कॉलेज की लडकी, झिंग झिंग झिंगाट, एक राधा एक मीरा, राधा ही बावरी, नवरी नटली, तनहाई तनहाई, अच्छा चलते है दुवा वो मे याद रखना, अशी विविध बहारदार गीते स्पर्धकांनी सादर केली तसेच प्रेक्षक विद्यार्थ्यांनी विविध गीतांचा मनमुराद आनंद लुटला.

- यावेळी अंतराग्नीचे विशेष आकर्षण ठरले 'संभाजी महाराजांची आहुती' व 'अफजल खानाचा वध' हा पोवाडा. पोवाड्याच्या थरारक सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी प्रेकाक्षकांची दाद मिळविली.
- यावेळी परीक्षक म्हणून प्रा.अनिल सोनार, प्रा. डॉ. सोनल पाटील, प्रा. अर्चना महाजन, प्रा. नरेंद्र महाजन, प्रा. धनेश पाटील, प्रा. गौरव धाडसे तर प्रा. स्वाती पाटील यांनी काम पाहिले.
- तर स्नेहसंमेलनासाठी प्रा. वसिम पटेल यांनी समन्वयकाची भूमिका बजावली तसेच विवेक पाटील या विध्यार्थ्याने सूत्रसंचालन केले.

## आज प्रसिद्ध गायक अमेय दाते यांच्या 'सूरमयी संध्याकाळ'चे आयोजन

'अंतराग्नी-२०२४' या शीर्षकाखाली सुरु झालेल्या तीन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच आज २७ बुधवार रोजी ५.३० वाजता जी. एच. रायसोनी महाविद्यालयाच्या भव्य पटांगणात होणाऱ्या या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण सुप्रसिद्ध गायक इंडियन आयडॉल फेम अमेय दाते हे राहणार असून हिंदी व मराठी गीतांचा बहारदार कार्यक्रम ते यावेळी सादर करणार आहे. त्यामुळे जी. एच. रायसोनी महाविद्यालयाच्या विध्यार्थ्यांना एका आंतरराष्ट्रीय गायकांची मैफिल मोठी पर्वणीच ठरणार आहे.

सायंदैनिक साईमत

RAISONI GROUP
a vision beyond

Wednesday 27/03/2024

# रायसोनी महाविद्यालयात युवा महोत्सव "अंतराग्नी"ची धूम

## वार्षिक स्नेहसंमेलनात विध्यार्थ्यांचा कलाविष्कार ; ५०० विद्यार्थ्यांनी नोंदविला सहभाग

**जळगाव : प्रतीनिधी**

येथील जी. एच. रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अँड बिजनेस मॅनिजमेंट महाविद्यालयात "अंतराग्नी-२०२४" या शीर्षकाखाली सुरु झालेल्या तीन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलनाचा उद्घाटन सोहळा दि. २६ मंगळवार रोजी उत्साहात झाला.



जी. एच. रायसोनी इस्टीट्युटच्या संचालिका प्रा. डॉ. प्रिती अग्रवाल यांनी फीत कापून केले या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन केले. विध्यार्थ्यांना मार्गदर्शन त्या म्हणाल्या की, स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या प्रतिभांसह कलागुणांना वाव मिळत असुन त्यांच्या सप्त गणांसह मानसिक, बौद्धिक तथा शारीरिक विकास साध्य होतो. असे म्हणत त्यांनी या स्नेह संमेलनानिमित्त आयोजित विविध स्पर्धा व कार्यक्रमाची माहिती दिली

अकॅडेमिक डीन प्रा. डॉ. संजय शेखावत यांनी म्हणाले की, स्नेहसंमेलनाचा प्रमुख हेतू विद्यार्थ्यांच्या अंगीभूत कलागुणांना प्रोत्साहन देणे, भारतीय संस्कृतीची ओळख करून देणे हा असतो. स्नेहसंमेलनात संस्कृती व ऐतिहासिक कार्यक्रमाची झलक सादर होत असल्याने त्यांनी यावेळी समाधान व्यक्त केले.

२६ ते २८ मार्च दरम्यान आयोजित या स्नेहसंमेलन कार्यक्रमांमध्ये नृत्य, गीत गायन, डिपार्टमेंट वॉर, पर्सनालिटी कॉन्स्टटे, दुसऱ्या दिवशी डे सेलिब्रेशन व तिसऱ्या दिवशी शिव महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांनी मोह मोह के धागे, मेरे कॉलेज की लडकी, झिंग झिंग झिंगाट, एक राधा एक मीरा, राधा ही बावरी, नवरी नटली, तनहाई तनहाई, अच्छा चलते है दुवा वो मे याद रखना, अशी विविध बहारदार गीते विद्यार्थ्यांनी सादर केली. यावेळी अंतराग्नीचे विशेष आकर्षण ठरले "संभाजी महाराजांची आहुती" व "अफजल खानाचा वद" हा पोवाडा. पोवाड्याच्या थरारक सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी प्रेकाक्षकांची चांगलीच दाद मिळविली

**आज प्रसिद्ध गायक अमेय दाते प्रमुख आकर्षण**

जी. एच. रायसोनी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अँड बिजनेस मॅनिजमेंट महाविद्यालयाच्या "अंतराग्नी-२०२४" या शीर्षकाखाली सुरु झालेल्या तीन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच आज दि २७ बुधवार रोजी ५.३० वाजता जी. एच. रायसोनी महाविद्यालयाच्या भव्य पटांगणात होणाऱ्या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण सुप्रसिद्ध गायक इंडियन आयडॉल फेम अमेय दाते राहणार असून हिंदी व मराठी गीतांचा बहारदार कार्यक्रम ते यावेळी सादर करणार आहे.

यावेळी परीक्षक म्हणून प्रा.अनिल सोनार, प्रा. डॉ. सोनल पाटील, प्रा. अर्चना महाजन, प्रा. नरेंद्र महाजन, प्रा. धनेश पाटील, प्रा. गौरव धाडसे तर प्रा. स्वाती पाटील यांनी काम पाहिले. तर स्नेहसंमेलनासाठी प्रा. वसिम पटेल यांनी समन्वयकाची भूमिका बजावली तसेच विवेक पाटील या विध्यार्थ्याने सूत्रसंचालन केले.

www.raisoni.net | Engineering | Management | Law | Schools | Other Courses
RAISONI GROUP OF INSTITUTIONS
NAGPUR ■ PUNE ■ JALGAON ■ AMRAVATI ■ AHMEDNAGAR ■ CHHINDWARA

दैनिक पुण्यप्रताप

RAISONI GROUP
a vision beyond

**Wednesday 27/03/2024**

# जी. एच. रायसोनी महाविद्यालयात युवा महोत्सव अंतराग्नीची धूम

